कटिबध्दा जनहिताय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३१३१०
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईट :- www.pcmcindia.gov.in

क्र. वैद्य/०९/कावि/५९९१/२०२०

दिनांक : २२/१२/२०२०

**विषय:-** **कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश**

**संदर्भ :-**
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्यविभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२० /प्रक्र.५८/आरोग्य- ५,दिनांक १४मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे परिपत्रक, क्रमांक - 2102011612020-PH दिनांक २१ डिसेंबर २०२०.

आदेश

ज्याअर्थी कोविड - १९ या आजारास जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक महामारी (Pandemic) घोषीत केले आहे.तसेच उपरोक्त संदर्भांकित अधिसूचनेनूसार महाराष्ट्र राज्यामध्ये अधिसुचनेच्या दिनांका पासून साथरोग अधिनियम,१८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणू मुळे उद्भवलेल्या कोविड -१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम – २०२० अंमलात आलेले आहेत.महाराष्ट्र कोविड-१९ उपायोजना नियम २०२० अन्वये कोविड -१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. दरम्यान, २१ डिसेंबर, २०२० पासून नवीन उत्परिवर्तन करणाऱ्या कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी सावधगिरीचा उपाय म्हणून साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मनपा क्षेत्रामध्ये कोवीड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

सार्स-कोविड -2 विषाणुची लागण युनायटेड किंगडम (यूके) मध्ये पसरत असुन सदर साथ वेगाने वाढत असुन एसएआरएस-सीओव्ही -2 चे स्वतंत्र फिलोजेनेटिक क्लस्टर सापडले आहे. हे पाहता, यूके कडून भारतात येणारी सर्व विमान उड्डाणे तात्तपुर्ती दिनांक २२ डिसेंबर २०२० चे मध्य रात्री पासून दिनांक ३१ डिसेंबर २०२० चे मध्य रात्री पर्यंत संदर्भिय क्र. ४ अन्वये निलंबित करण्यात आली आहेत

1. थेट किंवा अप्रत्यक्ष उड्डाणांद्वारे यूकेहून येणाऱ्या सर्व प्रवाश्यांचे हॉटेल जिंजर, वाकड व हॉटेल सयाजी वाकड येथे प्रवाशांच्या स्व:खर्चाने सात दिवसांसाठी संस्थात्मक विलगीकरण करण्यात यावे.
2. प्रवासी येताना लक्षणे आढळून आल्यास त्यास पुढील उपचारासाठी त्याला थेट पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नविन भोसरी रुग्णालय येथे दाखल करावे.
3. प्रवाशांचे आगमन झाल्या झाल्या आरटी-पीसीआर चाचणी करण्यात येणार नाही. तथापि, पाचव्या ते सातव्या दिवसा दरम्यान विलगीकरण केलेल्या प्रवाशांना स्व:खर्चाने हॉटेलमध्ये आरटी-पीसीआर चाचणी

करुन घ्यावी लागेल. चाचणीचा अहवाल नकारात्मक आढळल्यास सदर प्रवाश्याला पाच ते सात दिवसांनी संस्थात्मक विलगीकरण कक्षातुन सोडण्यात येईल, तसेच सदर प्रवाशास सात दिवसांचे अनिवार्य होम क्वारेन्टाईन व्हावे लागेल. जर आरटी-पीसीआर चाचणीचा निकाल सकारात्मक परंतु लक्षणे नसलेला आढळला तर त्याच हॉटेलमध्ये त्याचे विलगीकरण करण्यात येउन सदरचे विलगीकरण १४ दिवसांपर्यंत त्याच हॉटेलमध्ये अथवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नविन भोसरी रुग्णालयात सुरू ठेवण्यात येईल.

4. यूकेहून येणाऱ्या सर्व प्रवाश्यांची वाहतुक व्यवस्था पि एम पि एम एल यांचे मार्फत करण्यात यावी.
5. हॉटेलच्या शुल्कानुसार प्रवाशांना हॉटेलचे शुल्क आकारले जाईल.
6. सर्व प्रवाशांचे पासपोर्ट हॉटेलमध्ये जमा केले जातील आणि संस्थांत्मक विलगीकरण संपल्यावर हॉटेल सोडताना ते परत देण्यात येतील.
7. सदर प्रवाशांची आरटी-पीसीआर चाचणी खाजगी प्रयोगशाळांमार्फत करणेत येऊन त्याबाबतचे शुल्क प्रवाशांकडुन वसुलात आणावे.
8. उपरोक्त नमद सुचना युके वरुन येणाऱ्या सर्व प्रवाशांना त्यांच्या पुढील प्रवासाची योजना विचारात न घेता लागु राहील.

कोवीड -१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाव्दारे निर्गमित करणेत आलेल्या आदेशाचे उल्लंघन करणारा व्यक्ती, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ अन्वये दंडनिय अपराध केला असे समजून कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दि. २२/१२/२०२० पासून पुढील आदेश होई पर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

हा आदेश आज बुधवार दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

सही/-
( श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी४११ ०१८.

(अजित पवार)
अति. आयुक्त (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी४११ ०१८.

प्रत माहितीस्तव सादर –

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड
४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व सबंधित विभाग प्रमुख
५) व्यवस्थापक, पि.एम.पि. एम.एल.